महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, चौथा मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
☎: २६४७४२११, २६४७२१३१

website: www.mahadiscom.in
Email: gmntestt@mahadiscom.in


संदर्भः मा.सं./१ब/वै.प्र./ दि.:

## *प्रशासकीय परिपत्रक क्र. ४३५ दिनांक २५.१०.२०१२*

***विषयः- सामान्य आदेश क्र. २० (क) दि. १७.०६.१९६३ मधील विहीत आजारांच्या यादीमध्ये नवीन आजारांचा समावेश करण्याबाबत तसेच सद्य स्थितीत विहीत असलेल्या आजारांच्या यादीतील बदलाबाबत.***

************

सामान्य आदेश क्र. २०(क) दि. १७.०६.१९६३ चे सुधारपत्र क्र. ५६ दि. १९.०५.१९९० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी कंपनीचे वैद्यकीय सल्लागार, कार्यकारी संचालक (मा.सं.), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन सामान्य आदेश क्र. २०(क) दि. १७.०६.१९६३ मधील विहीत केलेल्या आजारांच्या यादीमध्ये खालील आजारांचा समावेश करण्याबाबत तसेच सद्य स्थितीत विहीत असलेल्या आजारांमध्ये बदल करण्यास मान्यता दिली आहे.

1. Swine Flue (स्वाईन फ्ल्यू)
2. Chikan Guniya (चिकन गुनीया)
3. Renal Calculi (Kidney Stone) (मूतखडा)
4. Hernia/Hydrocele (अंतर्गळ/जलांड शस्त्रक्रिया)

२. उपरोक्त आजारांवर कंपनीतील अधिकारी/कर्मचारी यांनी उपचार/शस्त्रक्रिया करुन घेतल्यास खालीलप्रमाणे वैद्यकीय प्रतिपूर्ती देय राहील.

अ) शासकीय/निमशासकीय/मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचार/शस्त्रक्रिया करुन घेतल्यास झालेल्या खर्चाची १००% प्रतिपूर्ती देय राहील. (सुधारपत्र क्र. ५६ दि. १९.०५.१९९०)

ब) खाजगी रुग्णालयात उपचार/शस्त्रक्रिया करुन घेतल्यास झालेल्या खर्चाची २५% च प्रतिपूर्ती देय राहील. (सुधारपत्र क्र. ४४ दि. १६.१२.१९८०)

क) शासकीय/निमशासकीय/मान्यताप्राप्त रुग्णालयात अधिकाऱ्यास /कर्मचाऱ्यांस असलेल्या आजारांवर उपचाराची सोय नसेल अथवा इतर काही कारणास्तव त्या रुग्णालयांनी खाजगी रुग्णालयात उपचारासाठी यांना पाठविल्यास (तसे प्रमाणपत्र सादर केल्यासच) खाजगी रुग्णालयातील उपचार/ शस्त्रक्रियेकरीता १००% प्रतिपूर्ती देय राहील.

३. सामान्य आदेश क्र. २०(क) दि. १७.०६.१९६३ च्या अंतर्गत विहीत आजारांच्या यादीतील अनुसूची "C" मधील तातडीच्या आजारांवरील उपचारामध्ये नमुद केलेल्या क्र. ५ मधील "Acute Abdominal Pain" या आजाराचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

1. Acute Pancreatitis (स्वादु पींडाचा तीव्र दाह)
2. Cholecystitis (पित्ताशयाचा तीव्र दाह)
3. Ulcer (अल्सर)

तसेच नियमित (Routine) "Acute Abdominal Pain" या आजाराचे निदान Colitis, Diarrhoes या मधून निष्पन्न होत असल्यास सदर आजाराकरीता झालेल्या खर्चाची २५% प्रतिपूर्ती देय राहील, तसेच सदर आजार हा विहीत आजारांच्या यादीतील अनुसुची "A" (Medical Disease) मध्ये समावेश करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अनुसुची "C" मधील क्र. १८ नुसार "Acute Abdominal Pain - Hysterectomy Operation" या आजारामध्ये बदल करण्यात येऊन सदर आजार Acute Haemarrhoge on Malignancy असा वाचण्यात यावा आणि नियमित Hysterectomy हा आजार विहीत आजाराच्या यादीतील अनुसुची "B" (Surgery Disease) मध्ये समाविष्ट करण्यात आला असून झालेल्या खर्चाची २५% प्रतिपूर्ती देय राहील.

४. सामान्य आदेश क्र. २० (क) दि. १७.०६.१९६३ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भातील इतर अटी व तरतूदी अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येईल.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या **इंट्रानेटवर** उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्रः वरीलप्रमाणे.

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक(मा.सं.)**

**प्रती**
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.